# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


**परिपत्रक** क्रमांक :-विकाअ/शिक्षण/परिपत्रक/२०१५/ 2567

दिनांक 14/10/2015

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित
पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दि. १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

संदर्भ :- मा. उपसचिव, मराठी भाषा विभाग, यांचे शासन परिपत्रक क्रमांक २०१५/प्र.क्र.८९/२०१५/भाषा-३ दिनांक १४ ऑक्टोम्बर २०१५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने त्यांचा दिनांक १५ ऑक्टोम्बर हा जन्मदिवस **"वाचन प्रेरणा दिन"** म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयास अनुसरुन आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दीगत करण्याच्या दृष्टीने उच्च व तंत्र शिक्षण विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. **"वाचन प्रेरणा दिनाचे"** औचित्य साधून आपल्या संस्थेत खालील प्रमाणे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१) दि. १५ ऑक्टोबर, रोजी शासकीय कामकाजाच्या वेळेमध्ये किमान अर्धा तास वाचनासाठी देण्यात यावा.

२) वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटूंबातील सदस्य इत्यादीना किमान एक पुस्तक भेट द्यावे.

३) WhatsApp, Internet, Facebook, Twitter अशा प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दीगत होईल / वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.

४) व्याख्यान / भाषण / चर्चासत्र / सामुहिक वाचन / अभिवाचन / वाचन अनुभव कथन / ग्रंथप्रदर्शन/विविध स्पर्धा इ. पैकी सुयोग्य उपक्रम राबवावेत.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.